# सराहन - चायल

**सराहन**

सिमला जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग २२ च्या आसपास २५-३० किलोमीटर आत गेलं तर सराहन, चायल सारखी अनेक ठिकाणं आहेत की ज्या ठिकाणी जाऊन आपण हिमालयात निवांतपणे भटकण्याचा आनंद घेवू शकतो. अगदी चार रात्री पाच दिवसांचा कार्यक्रम आखून चंदीगढहून निघाल्यास या दोन्ही ठिकाणचा प्रवास संस्मरणीय होऊ शकतो. सराहान हे ठिकाण सिमल्यापासून १८० किलोमीटरवर आहे.




सराहानला आम्ही 'हॉटेल श्रीखंड' मध्ये राहिलो होतो. हिमाचल प्रदेश पर्यटन महामंडळाचं 'हॉटेल श्रीखंड' (समोरच दिसणाऱ्या श्रीखंड महादेव पर्वतावरून हे नाव ठवलं आहे.) अशा ठिकाणी आहे की संपूर्ण सराहान व्हॅलीचं दर्शन अगदी प्रत्येक खोलीतून होतं. फक्त हॉटेलमध्ये विश्रांती घेणाऱ्यालाही इथे शांती लाभू शकेल. जवळच पुरातन कालीन भिमाकाली मंदीर परिसर आहे. बुशहर संस्थानची राजधानी असलेलं हे ठिकाण असून भिमाकाली मंदीर हे एकावन्न शक्तिपीठांपैकी एक आहे. पुरातन वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेलं भिमाकाली मंदीर देखणं आहे. लाकूड आणि धातूमध्ये केलेलं कोरीव काम हे या मंदीराचं वैशिष्ट्य आहे. चहूबाजूंनी हिमाच्छादित शिखरांनी वेढलेल्या या ठिकाणी राहण्याचा आनंद काही औरच आहे.

**चायल**




चायल सिमल्यापासून ४४ किलोमीटरवर आहे. पतियाळाच्या महाराजांचं हे उन्हाळ्यातील वास्तव्याचं ठिकाण असून संपूर्ण भाग देवदार वृक्षांनी वेढला आहे. चायल आता अभयारण्य म्हणून घोषित झालं असून जंगलाचा बऱ्यापैकी अनुभव घेता येतो.

या ठिकाणी राहून फागू, कुफरी आणि शिमला या ठिकाणीही आपण फिरायला जाऊ शकतो. पतियाळाच्या महाराजांचं तेव्हाचं निवासस्थान आता हिमाचल प्रदेश पर्यटन महामंडळाच्या हॉटेल चायल पॅलेसमध्ये रुपांतरित केलं असून अन्य पर्यटकांना तिथे तिकीट काढून भेट देता येते.

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/

http://shabdshabd.blogspot.com/